महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे

# आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त)

कर्वे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४. महाराष्ट्र । फोन : ०२०-४१०३८२००
E-mail: abasahebgarwarecollege@gmail.com | www.garwarecollege.mespune.in

प्रा. (डॉ.) गौतमी रा. पवार
एम्.ए., पीएच्. डी.
प्रभारी प्राचार्य

- NAAC Re-Accredited 'A' Grade
- Best College Award - Savitribai Phule Pune University
- Best Student Development Board Award - Savitribai Phule Pune University

- I.D. No. PU/PN/A.S./009 (1945)
- JR COLLEGE CODE : 11.003
- AISHE CODE : C-41477

संदर्भ क्र. :

दिनांक : 07/02/2023

## जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात
## महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इयत्ता ११ वी आणि इयत्ता १२ वी शास्त्र शाखेत मध्ये जे विद्यार्थी शिकत आहेत, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात सर्व प्रमाणपत्रांची पूर्तता करून दिनांक- २०-२-२३ पर्यंत १०.३० ते १.०० या निर्धारित वेळेत येऊन श्री. सुभाष गायकवाड यांचेकडे सदर प्रस्ताव देण्यात यावेत.

तसेच संबधित विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील असणे अनिवार्य आहे. इतर जिल्ह्यातील प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी .

7.2.2023

MES Abasaheb Garware College Pune-4

(प्रा. डॉ.गौतमी राघवराव पवार)
प्रभारी प्राचार्य
आबासाहेब गरवारे महाविद्यालय
कर्वे रोड, पुणे ४११००४

सोबत:- आवश्यक असणारी कागदपत्रे, सोबत दिलेल्या यादीनुसार.

# (विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी)

- WWW.BARTI.MAHARASHTRA.GOV.IN या वेबसाईव्दारे CCVIS लिंकवरून ऑनलाईन फॉर्म भरणे
- सदर अर्जाची प्रिंट-आऊट काढून त्यावर अर्जदाराचा फोटो चिटकवून संबंधित कॉलेजचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का घेणे
- उमेदवाराचा जातीचा दाखला पुणे जिल्हयातील असणे अनिवार्य आहे
- कॉलेजचे बोनाफाईड लेटर व कव्हरींग लेटर जोडणे आवश्यक आहे
- अर्जदाराच्या जातीच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy);
- वडीलांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- वडीलांच्या जातीचा दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- सख्खे चुलते किंवा आत्या यांच्या शाळा सोडल्याची झेरॉक्सप्रती (Attested/True Copy)
- आजोबांच्या शाळा सोडल्याची दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- (विदयार्थ्यांकरिता) विशेष कार्यकारी अधिकारी तथा दंडाधिकारी यांचेसमोर /नोटरी वकील अगर नागरी सुविधा केंद्र, यांचेकडून साध्या पेपरवर नमुना १६, १७ व ३ मध्ये शपथपत्र व वंशावळ करुन आणणे
- वर नमूद वंशावळ व प्रतिज्ञापत्राचे नमुने ऑनलाईन अर्जाची प्रिंट-आउट काढल्यानंतर अर्जासोबत उपलब्ध होतात.
- अनुसूचित जाती (S.C.) १९५० पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- इतरमागास प्रवर्ग (O.B.C.) १९६७ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- भटक्या जाती/जमाती (V.J.N.T) १९६१ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- विशेष मागासप्रवर्ग (S.B.C.) १९६७ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- (इतर महसुली पुरावे) वडीलांच्या नावे/आजोबांच्या अगर पंजोबांच्या नावे गाव नमुना नं- १४ किंवा ७/१२/८-अ चा उतारा/हक्काचे पत्र/कडई पत्र/ वारस रजिष्टर नोंद/महसुली पुरावे अगर मृत्यूचे दाखले/शेती अगर घर खरेदी नोंदीचे उतारे/प्रॉपर्टी कार्ड/ संबंधित व्यवसायाचे जुने पुरावे/दुकान परवाना (ज्यात जातीची नोंद आहे असे)
- ऑनलाईन फॉर्म भरताना काही अडचण आल्यास 18002330444 या टोल फ्रि क्रमांकावर संपर्क साधावा
- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २३ मे २००१, नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्या संबंधातील जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कलम ३ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत आणि या अधिनियमान्वये सक्षम प्राधिका-याकडून किंवा पडताळणी समितीकडून किंवा अपील प्राधिका-याकडून करण्यात येणा-या कोणत्याही चौकशीच्या बाबतीत किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीच्या बाबतीत (आपण त्या जातीचे जमातीचे किंवा वर्गाचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तीवर असेल.)